सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २२ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'मोदींच्या धमन्यांत रक्त नाही तर गरम सिंदूर वाहतो' पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बिकानेर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमधील बिकानेर येथील जाहीर सभेत बोलत असताना पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर जोरदार टीका केली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिल्याचे ते म्हणाले. पंतप्रधान मोदी म्हणाले, पहलगाम येथे निष्पापांवर गोळ्या झाडल्या गेल्या. पण त्या गोळ्या १४० कोटी भारतीयांना लागल्या. यानंतर प्रत्येक नागरिकाने संकल्प केला होता की, दहशतवादाला मातीत गाडले जावे. आम्ही सैन्याच्या तीनही दलाला मोकळीक दिली. तीनही दलांनी असे चक्रव्यूह रचले की पाकिस्तानला गुडघे टेकावे लागले. तसेच मोदींच्या धमन्यांत रक्त नाही तर गरम सिंदूर वाहतो, असेही पंतप्रधान मोदी आपल्या भाषणात म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, २२ तारखेच्या पहलगामवरील हल्ल्याच्या प्रत्युत्तरात आम्ही २२ मिनिटांत दहशतवाद्यांचे नऊ ठिकाणांना उध्वस्त केले. जेव्हा सिंदूर तोफगोळा होतो तेव्हा काय परिणाम साधतो, हे आता जगाने आणि देशाच्या शत्रुनेही पाहिले आहे.

एअर स्ट्राईकनंतर मी इथे आलो होतो तेव्हाच म्हणालो होतो की, या मातीची शपथ आहे, देशाची मान मी झुकू देणार नाही. आज राजस्थानच्या भूमीमधून देशातील नागरिकांना नम्रपणे सांगू इच्छितो की, जे लोक कुंकू (सिंदूर) पुसायला निघाले होते. त्यांना आम्ही मातीत गाडले. जे भारताचे रक्त सांडत होते, त्यांच्याकडून रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब घेतला आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, भारत शांत राहिल, असा जे विचार करत होते, आज ते घरात लपून बसले आहेत. जे स्वतःच्या शस्त्रावर गर्व करत होते, ते आज कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत.पहलगाम येथील हल्ल्यानंतर प्रत्येक भारतीय संतापलेला आहे. पंतप्रधान मोदी प्रत्येक सभेत बोलताना पाकिस्तानवर घणाघाती टीका करत असतात. आज राजस्थानातील एका जाहीर सभेत पीएम मोदींनी पुन्हा एकदा पाकिस्तानला कठोर शब्दांत फटकारलं आहे. . भारत आपल्या हक्काचं पाणी कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानला देणार नाही. पाकिस्तानच्या अण्वस्त्र देश असल्याची धमकी आता भारत सहन करणार नाही. पाकिस्तानशी जर चर्चा करण्याची वेळ आलीच तर फक्त पाकव्याप्त काश्मीरच्याच मुद्द्यावर चर्चा होईल. पीएम मोदींचा पाकिस्तानला हा ३झ असा इशारा होता.

राजस्थानच्या बिकानेर येथे पंतप्रधान मोदींनी भारत स्टेशन योजनेअंतर्गत पुनर्विकास केलेल्या देशनोके स्थानकाचे उद्घाटन केले. देशभरात १,३०० हून अधिक रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जाणार असून या उपक्रमाचा हा एक भाग आहे.

**मोदीच्या धमन्यात रक्त नाही गरम सिंदूर वाहते**

पाकिस्तानवर टीका करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, पाकिस्तान भारताशी थेट लढाई कधीच जिंकू शकत नाही. जेव्हा जेव्हा थेट लढाई झाली, तेव्हा तेव्हा ते तोंडावर आपटले. यासाठीच ते भारताविरोधात दहशतवादाचा शस्त्राप्रमाणे वापर करतात. स्वातंत्र्यप्राप्तीपासून कित्येक दशके हेच सुरू होते. पाकिस्तान दहशतवाद पसरवून निर्दोष लोकांचे बळी घेत होता. पण पाकिस्तान हे विसरला की, भारताचा सेवक मोदी इथे छातीठोकपणे उभा आहे. मोदीचे मस्तिष्क शांत असले तरी मोदीचे रक्त उसळत आहे. आता तर मोदीच्या धमन्यातून रक्त नाही तर गरम सिंदूर वाहत आहे, असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

## सलमान खानच्या थेट घरात मध्यरात्री अज्ञात महिला घुसली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या सुरक्षेत मोठी चूक झाल्याची माहिती मिळत आहे. राष्ट्रवादीचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळी घालून हत्या करण्यात आल्यानंतर बिष्णोई गँगनं सलमान खानला जीवे मारण्याची धमकी दिली होती. तेव्हापासूनच सलमान खान सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात फिरत असल्याचं पाहायला मिळत आहे. सलमान जिथे जातो, तिथे सलमानभोवती सुरक्षारक्षकांचा वेढा दिसतो. एवढंच काय तर, सलमान खानच्या घराभोवतीही मोठी सुरक्षा पुरवण्यात आली आहे. पण, ही सुरक्षा भेदत एका महिलेनं थेट सलमान खानच्या घरात प्रवेश केल्याची माहिती मिळत आहे. याचं सीसीटीव्ही समोर आलं आहे. १९ मे २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास एक महिला थेट अभिनेता सलमान खानच्या घरात घुसली.

## 'संघराज्य रचनेचा अनादर, एऊने सर्व मर्यादा ओलांडल्या...', सर्वोच्च न्यायालयाने सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नवी दिल्ली**

तामिळनाडूतील सरकारी मालकीची मद्य कंपनी (तामिळनाडू स्टेट मार्केटिंग कॉर्पोरेशन) विरुद्ध अंमलबजावणी संचालनालय कडून करण्यात येणाऱ्या तपास आणि छाप्यांना सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सुनावणीदरम्यान ईडीच्या कारवाई तीव्र नाराजी व्यक्त केली अन् एजन्सीने सर्व मर्यादा ओलांडल्या, अशी टिप्पणीदेखील केली.

मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध तामिळनाडू सरकारने मंगळवारी (२० मे) सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश आला आहे. मद्रास उच्च न्यायालयाने २३ एप्रिल रोजी ईडीला तपास पुढे चालू ठेवण्यास परवानगी दिल्याच्या निर्णयानंतर हे अपील करण्यात आले होते. ईडीने तमिळनाडूमध्ये १,००० कोटी रुपयांच्या मद्य घोटाळ्याचा आरोप केला असून, ज्यात डिस्टिलरीजनी मद्य पुरवठ्याचे ऑर्डर





मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम दिल्याचे म्हटले आहे.

तामिळनाडू सरकारने सांगितले की, त्यांनी २०१४ ते २०२१ दरम्यान ढ-डच-उ च्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध ४१ एफआयआर दाखल केल्या आहेत. राज्य सरकार मद्य विक्री परवाने देण्यातील अनियमिततेसह इतर आरोपांची चौकशी करत आहेत. अशा परिस्थितीत ईडीने या प्रकरणात गुन्हा दाखल केला. यावर सरन्यायाधीशांनी मोठे आश्चर्य व्यक्त केले. सर्वोच्च न्यायालयाला असेही आढळून आले की, ईडीची कारवाई विसंगत होती आणि कदाचित असंवैधानिक होती. कारण, कायदा आणि सुव्यवस्था हा राज्याचा विषय आहे.

सरन्यायाधीश गवई म्हणाले की, 'थेट महामंडळालाच आरोपी बनवण्यात आले' ईडी सर्व मर्यादा ओलांडत आहे. हा संघराज्य रचनेचा अनादर आहे. जेव्हा राज्य सरकार चौकशी करत आहे, तेव्हा अशा हस्तक्षेपाची काय गरज होती?' तामिळनाडू सरकारकडून बाजू मांडणारे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल आणि ढ-डच-उ कडून बाजू मांडणारे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी महामंडळाच्या कार्यालयात छापेमारीदरम्यान कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, सर्वांचे फोन क्लोन केले गेले. ईडीने गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन केले आहे. या प्रकरणात ईडीची कोणतीही भूमिका नाही, असेही सिब्बल आणि रोहतगी म्हणाले.

## पहलगाम हल्ल्यादरम्यान ज्योती पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या अधिकाऱ्याच्या संपर्कात

### ज्योतीच्या ३ मोबाईल आणि लॅपटॉपचा फॉरेन्सिक रिपोर्ट दोन दिवसांत येईल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२हिसार**

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या ज्योती मल्होत्राला हरियाणाच्या हिसार पोलिसांनी गुरुवारी न्यायालयात हजर केलं. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने पोलिसांना ज्योतीच्या मेडिकल रिपोर्टबद्दल विचारलं आणि कागदपत्रं पाहिली.

न्यायालयात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योतीच्या बँक अकाऊंटचे तसेच फोन आणि लॅपटॉपचे फॉरेन्सिक डिटेल्स दोन दिवसांत उपलब्ध होतील, ज्याच्यासाठी तिची चौकशी करणं अत्यंत आवश्यक आहे. ज्योतीने देशातील अनेक राज्यांमध्ये जाऊन तिचे व्हिडीओ बनवले होते. तिथल्या पोलिसांशी संपर्क करण्यात आला आहे, गरज पडल्यास तिला तिथे नेऊन चौकशी करावी लागू शकते.



चौकशीदरम्यान ज्योती अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यास टाळाटाळ करत असल्याचं हिसार पोलिसांनी सांगितलं. पहलगाम हल्ल्यानंतर जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव होता, तेव्हा ज्योती एका पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होती अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. ज्योतीच्या ३ मोबाईल आणि लॅपटॉपचा फॉरेन्सिक रिपोर्ट दोन दिवसांत येईल.

हरियाणातील हिसार येथील ३३ वर्षीय युट्यूबर आणि ट्रॅव्हल ब्लॉगर ज्योती मल्होत्राला १७ मे रोजी पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेसाठी (आयएसआय) हेरगिरी केल्याच्या आणि संवेदनशील माहिती शेअर केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. तपास यंत्रणांना असं आढळून आले आहे की, ज्योती चार वेळा मुंबईत आली होती. ज्योती २०२४ मध्ये तीनदा आणि २०२३ मध्ये एकदा मुंबईत आली. प्रत्येक वेळी तिने मुंबईच्या विविध भागांचे फोटो काढले आणि व्हिडीओ बनवले होते.

## नाशिकच्या जिंदाल कंपनीतील आग धोकादायक वळणावर, एक किलोमीटरचा परिसर निर्मनुष्य करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नाशिक**

मुंबई-नाशिक महामार्गावरील मुंडेगाव शिवारात असलेल्या जिंदाल पॉलिफिल्म कंपनीत मंगळवारी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास लागलेली आग अद्याप सुरू आहे. या आगीत दोन कर्मचारी किरकोळ भाजले आहेत. मात्र आता या आगीने पुन्हा रौद्ररूप धारण केलं आहे. कंपनीच्या आतमध्ये असलेल्या गॅस टाक्या फुटल्यास धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी एक



किलोमीटर परिसर निर्मानुष्य करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार जिंदाल कंपनीच्या चार नंबर गेटच्या मागील शेडमध्ये मोठ्या प्रमाणावर भंगार साहित्य ठेवण्यात आलेले असून याच भागात मंगळवारी रात्रीच्या सुमारास आग लागली. थोड्याच वेळात आगीनं रौद्र रूप धारण केलं तर आगीमुळे आकाशात धुराचे लोट पसरले. घटनेची माहिती मिळताच इगतपुरी नगरपरिषद तसेच नाशिक इथून अग्निशामक दलाच्या सात ते आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू केले, सुदैवानं या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र मालमत्तेचं मोठं नुकसान झालं आहे. आज सकाळी पुन्हा आग मोठ्या प्रमाणत पसरल्याने कंपनीच्या आतमध्ये असलेल्या गॅस टाक्या फुटल्यास धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी एक किलोमीटर परिसर निर्मानुष्य करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिंदाल कंपनीमध्ये अग्निशमक दलासोबतच एनडीआरएफ आणि सीबीआरएनच्या टीम दाखल झाल्यात. कंपनीतील प्रोपेन गॅसच्या टँक सध्या तरी सुरक्षित असल्याचे सांगण्यात येत आहे. नाशिकसह ठाणे आणि पुणे येथून अग्निशमन दलाचे पथक दाखल झाले आहे. प्रोपेन गॅस टँक सुरक्षा आणि धोका लक्षात घेता कंपनी भोवतालचा एक किलोमिटर परिघातील परिसर निर्मनुष्य करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिले आहेत.

## मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागा; जागावाटपाची चर्चा नको, मित्रपक्षांवर टीका टाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

मुंबई, ठाणे, पुणेसह राज्यभरातील महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्यापासून सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे मतदान होऊ शकते, असा कयास आहे. याच पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात वेगवान घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत. शिवसेना शिंदे गटानेही आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कंबर कसून तयारीला लागले आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध राजकीय पक्षांतून शिवसेना पक्षात सामील झालेल्या मुंबईतील माजी नगरसेवकांसोबत संवाद साधला. आगामी महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांना तयारीला लागण्याचे निर्देश एकनाथ शिंदे यांनी याप्रसंगी दिले. याबाबत एकनाथ शिंदे यांनी एक्सवर एक पोस्ट करत माहिती दिली आहे.

महायुतीचे सरकार अस्तित्वात आल्यावर गेल्या अडीच वर्षात केलेली रस्ते काँक्रीटीकरणाची कामे, एसटीपी उभारणीची कामे, सुशोभीकरणाची कामे, बाळासाहेब ठाकरे आपला



दवाखाना, आरोग्य सुविधा वाढवण्याची कामे असतील, कोस्टल रोड, मेट्रोची अशा अनेक लोकोपयोगी कामांची माहिती त्यांना दिली. ही सर्व कामे या माजी नगरसेवकांना समजावून सांगितली आणि ती कामे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करत, मुंबई शहर आमूलाग्र बदलत असून ते खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय शहर म्हणून नावारूपाला येत आहे. राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण नुकतेच जाहीर केले आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर घरांची निर्मिती केली जाईल तसेच रखडलेल्या इमारतींचा शासकीय यंत्रणांच्या भागीदारीतून पुनर्विकास करण्यात येईल. ज्यामुळे मुंबईबाहेर गेलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत येऊन राहू शकेल. या धोरणाची माहिती त्यांना यावेळी एकनाथ शिंदे यांनी करून दिली.

दरम्यान, त्यासोबतच त्यांच्या विभागातील प्रश्न, त्यांच्या अडचणी यादेखील जाणून घेतल्या आणि त्या सर्व नक्की सोडवण्याचा प्रयत्न करू असे आशवस्त केले. तसेच जागा वाटपाचा निर्णय हे महायुतीतील तीन प्रमुख नेते घेतील, त्यामुळे याबाबत चर्चा करू नका. कोणीही मित्रपक्षांबद्दल किंवा युतीतील मित्रपक्षाविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणे टाळा. मित्रपक्षाविरोधात आक्षेपार्ह टिपण्णी करू नका. मित्र पक्षातील संबंध ताणले जातील, एकमेकांवरती कुरघोडी टाळण्यासाठी उत्तराला प्रतिउत्तर देताना काळजी घ्या, अशा काही सूचना एकनाथ शिंदे यांनी पक्षातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## संपादकीय ......

# चिंता मुलांच्या बदलत्या वर्तणुकीची

आजची मुले डिजिटल नेटिव्हस आहेत. म्हणजेच, त्यांचा जन्म अशा जगात झाला आहे, जिथे स्मार्ट फोन, टॅबलेट आणि इंटरनेट हा दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. पूर्वी मुले मैदानी खेळात आणि मित्रांसोबत वेळ घालवत असत. आज मात्र ती मोबाईलवर गेम खेळण्यात, व्हिडीओ पाहण्यात आणि सोशल मीडियावर गुंतलेली असतात.तंत्रज्ञानाने शिक्षण आणि मनोरंजनाचे अनेक नवीन दरवाजे उघडले असले, तरी त्याचा अनियंत्रित आणि अतीव वापर मुलांच्या मानसिक आरोग्यावर घातक ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते, लहान वयात मोबाईल व इंटरनेटचा वापर मुलांच्या मेंदूच्या विकासावर, भावनात्मक समतोलावर आणि सामाजिक कौशल्यांवर विपरीत परिणाम करतो. मुलांचा मेंदू संवेदनशील टप्प्यात विकसित होत असतो. अशावेळी स्क्रीनचा अतिवापर त्यांच्या 'प्रीफ्रंटल कॉर्टेक्स'वर परिणाम करतो.मेंदूचा हा भाग भावना नियंत्रित करण्यास आणि निर्णय घेण्यास मदत करतो. मोबाईल गेम्स आणि सोशल मीडियावरील वेगाने बदलणारी दृश्ये आणि तत्काळ मिळणारे बक्षीस किंवा गेममधील विजय किंवा 'लाईक्स' मुलांच्या मेंदूमधील डोपामिनच्या स्तरात वाढ करतात. परिणामी, ती मुले नेहमीच तत्काळ समाधानाची अपेक्षा ठेवतात. साहजिकच प्रत्यक्ष आयुष्यात तसे होत नाही, तेव्हा ती निराश, चिडचिडी आणि संतापी बनतात.

इंटरनेटवरील अनेक गेम्स आणि व्हिडीओंमध्ये हिंसा, आक्रमकता आणि असभ्य वर्तन दाखवले जाते. मुलांचा मेंदू अद्याप परिपक्व झालेला नसल्यामुळे ते अशा हिंसक वर्तनाला सामान्य मानू लागतात. अनेक लोकप्रिय मोबाईल गेम्समध्ये युद्ध, मारामारी आणि विध्वंसाचे दृश्य सर्रासपणे असते, जे मुलांमधील आक्रमक प्रवृत्तीला खतपाणी घालते. मोबाईल आणि इंटरनेटच्या अतिरेकामुळे मुले प्रत्यक्ष नात्यांपासून म्हणजेच मित्र, पालक, शिक्षकापासून दूर जाऊ लागतात. ती सोशल मीडियावर सतत सक्रिय असतात; पण खर्या सामाजिक संबंधांतून मागे पडतात. यामुळे एकटेपणा आणि भावनिक पोकळी निर्माण होते.तीच पुढे राग आणि आक्रमकतेच्या रूपात प्रकट होते. रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरण्याने निळ्या प्रकाशाचा परिणाम मुलांच्या झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम करते. अपुरी झोप चिडचिड, तणाव आणि राग वाढवते. एका संशोधनानुसार, जी मुले रात्री जास्त वेळ स्क्रीनसमोर असतात, त्यांच्यात भावनिक अस्थिरता आणि आक्रमक वर्तनाची शक्यता जास्त असते. सोशल मीडियामुळे मुलांमध्ये सतत इतरांशी तुलना करण्याची सवय निर्माण होते. दुसर्यांचे 'परफेक्ट' आयुष्य, चेहरा किंवा यश पाहून ती स्वतःला कमी लेखतात. यामुळे आत्मविश्वासात घट होते आणि असमाधान वाढीस लागते. याचे रूपांतर पुढे राग किंवा असंतोषाच्या रूपात बाहेर पडते.

लहान वयात मोबाईल व इंटरनेटचा अतिरेक केवळ राग आणि आक्रमकतेपुरता मर्यादित राहत नाही. याचे दीर्घकालीन परिणामही अधिक गंभीर आहेत. मुलांची लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी होत आहे. सर्जनशीलता प्रभावित होत आहे आणि भावनिक स्थैर्य डगमगत आहे. याशिवाय, सातत्याने स्क्रीन वापरण्यामुळे लठ्ठपणा, डोळ्यांचे त्रास आणि चुकीच्या स्थितीत बसण्याच्या सवयी यासारखे शारीरिक त्रासही होत आहेत.

ही समस्या हाताळण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाजाने एकत्र येऊन सक्रिय भूमिका घेणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार २ ते ५ वर्षांच्या मुलांसाठी रोज १ तासापेक्षा जास्त स्क्रीन टाईम टाळावा. मोठ्या मुलांसाठीही वयोमानानुसार मर्यादा ठेवावी. मुलांना मैदानी खेळ, संगीत, चित्रकला, वाचन यांसारख्या सर्जनशील आणि सामाजिक उपक्रमांत सहभागी करून घ्यावे. पालकांनी मुलांसोबत रोज काही वेळ एकत्र घालवावा. एकत्र जेवण, गोष्टी सांगणे किंवा फेरफटका मारणे यामुळे भावनिक जवळीकता वाढते.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता अकरावी व बारावी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यावसायिक व अवसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेता येईल. परंतु ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांनाच या योजनेचा लाभ घेता येणार आहे.अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नसल्यास विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट लाभ जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. योजनेचे निकष व अटी पोर्टलवर उपलब्ध आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जाचा विहित नमुना हारी.ारहरळीं.ाि वर उपलब्ध आहे.वरिल संकेतस्थळावरून काही विद्यार्थ्यांनी अर्ज डाऊनलोड करून अर्जासोबत जोडलेल्या आवश्यक कागदपत्राच्या यादीसह सहायक आयुक्त समाज कल्याण



अमरावती कार्यालयामध्ये जमा केलेले नाही. एकुण १ हजार ४७६ विद्यार्थ्यांनी अपूर्ण अर्ज सादर केल्यामुळे त्यांचे अर्ज पोर्टलवर प्रलंबित असून याबाबत विद्यार्थ्यांना पोर्टवर सेंट बॅक करून ऑनलाईन पोर्टवर अर्जामध्ये नमूद भ्रमणध्वनी तसेच ईमेलव्दारे कळविण्यात आलेले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्जातील त्रुटी पुर्तता केलेली नाही, त्यांनी त्रुटीची पुर्तता बातमी प्रसिध्द झाल्यापासून दोन दिवसाच्या आत करण्यात यावी. याबाबत विलंब झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहील. विद्यार्थ्यांनी त्रुटीची पुर्तता करून आवश्यक कागदपत्र कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावा.अधिक माहितीसाठी सामाजिक न्याय भवन, सहायक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती चांदुर रेल्वे रोड, सी. पी. ऑफीसच्या मागे अमरावती त स ` च ।शिश्रवीुरीीशवळषारळश्र.लो व दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६१२६१ यावर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.-

# कोरोना विषाणूचा व्हेरियंट सौम्य; घाबरू नका, काळजी घ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती** - सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये कोरोना रुग्ण वाढल्याने काळजी घेण्यात येत आहे. राज्यात मे महिन्यात दि. १९ अखेर ६७३ चाचण्यांद्वारे ८७ रुग्णांमध्ये कोरोनाचे निदान झाले आहे. त्यापैकी ३१ बरे झाले, तर ५६ जणांवर घरीच उपचार सुरू आहेत. मात्र, कोरोना विषाणूचा सध्याचा व्हेरियंट सौम्य स्वरूपाचा असल्याने नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. मात्र योग्य ती काळजी घ्यावी, असे वैद्यक तज्ज्ञांचे मत आहे. कोरोनाचे सर्व सक्रिय रुग्ण मुंबईतील आहेत. रुग्ण वेगवेगळ्या परिसरातील असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. इतर जिल्ह्यांमध्ये एकही सक्रिय रुग्ण नाही.



यापूर्वी जानेवारीत २ फेब्रुवारीत १ आणि एप्रिलमध्ये ४ रुग्णांचे निदान झाले होते. मार्चमध्ये एकही कोरोना रुग्ण आढळून आला नाही. कोरोनाचे रुग्ण वाढत असले तरी मोठ्या लाटेचा धोका नसल्याचा वैद्यकीय तज्ज्ञांचा दावा आहे. कोरोनाचा विषाणू पूर्ण नष्ट झाला नसून, अधूनमधून डोके वर काढत आहे. मात्र सध्याचा व्हेरियंट सौम्य आहे आणि मृत्यूदरही अल्प आहे. त्यामुळे कोरोना नागरिकांनी घाबरून जाऊ नये.




## प्रमाणापेक्षा जास्त केसगळती-टक्कल पडण्याची भीती वाटते? रोज प्या आयुर्वेदिक ड्रिंक, केसांच्या वाढीसाठी असरदार उपाय

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक**

हल्ली केसगळती अतिशय सामान्य समस्या झाली आहे.अगदी लहान वयापासून ते वयोवृद्धापर्यंत अनेकांना केसगळतीच्या समस्यांना सामोरे जावे लागते आहे. केस गळण्यामागे असंख्य कारणे असू शकतात. यावर वेळीच उपाय केला नाही तर केसगळतीची समस्या वाढू शकते.



बाहेरचे प्रदूषण, केमिकल्स उत्पादने, केसांना पुरेसे पोषण न मिळणे आणि पुरेशी झोप न घेणे , मानसिक ताण याचा सगळ्यात जास्त परिणाम हा आपल्या केसांवर होतो. केस एकदा गळायला लागले की ते दिवसेंदिवस जास्तच गळू लागतात. केस पातळ होणे, टक्कल दिसणे, केसात कंगवा घातला की केस हातात येणे यांसारख्या गोष्टी अधिक होतात. महागतले शाम्पू, तेल केसांना लावून देखील केसगळतीची समस्या कायम राहते.

अनेकदा केसांशी संबंधित समस्यांमधील सगळ्यात सामान्य कारण म्हणजे केसांना पोषक तत्व न मिळणे. अनेकदा शरीरातील पोषक तत्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी पूरक आहार घेतात. केसगळती रोखण्यासाठी आपण औषधे घेतो, ज्याचा आपल्या आरोग्यावर परिणाम होतो. परंतु, केसगळती रोखण्यासाठी आपण आयुर्वेदिक ड्रिंक प्यायला हवे.

# खरीप पिकांची पेरणी करण्याआधी 'हे' तपासून पहा, वाचा सविस्तर




**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

गेल्या काही वर्षात वळवाचा किंवा मान्सूनपूर्व पाऊस नित्याप्रमाणे मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात पडत नाही. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर ऋतुचक्रात बदल होऊन वर्षातील तीनही हंगाम साधारणपणे १५ दिवस ते १ महिन्याच्या कालावधीने उशिरा सुरू होत होऊ लागले आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून अलीकडे वळवाचा पाऊसही जून महिन्यात नियमित मान्सूनच्या काही दिवस अगोदर पडायला लागला आहे. मात्र पडणारा हा पाऊस खरीप पिकांच्या पेरणीसाठी पुरेसा पडत नसतो, हा पाऊस म्हणजे वळवाचा पाऊस आहे असे गृहीत धरून नेहमी मे महिन्यात करण्यात येणारी शेतीचीपूर्वमशागतीची कामेशेतकऱ्यांनी या पावसानंतर त्वरित हाती घ्यावीत.

जमिनीची उन्हाळी नांगरट झाल्यानंतर शेतात मातीची घट्ट अशी ढेकळे मोठ्या प्रमाणात तयार होतात. कडक उन्हाळ्यात अशा प्रकारची ढेकळे चांगली तापून निघाल्यामुळे पडलेल्या मान्सूनपूर्व पावसानंतर किमान २ कोळपण्या किंवा वखरण्या करून जमीन भुसभुशीत करणे गरजेचे असते. अशा भुसभुशीत

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




जमिनीत पुढे पावसाचे पडणारे पाणी चांगल्या प्रकारे मुरते.

तसेच बी उगवणीसाठी जमिनीत योग्य वातावरणही तयार होते. मान्सूनपूर्व पावसाच्या ओलीवर कुठलीही मशागत न करता घाईने शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली व पाऊस लांबला किंवा लागोपाठ मोठे पाऊस झाले तर केलेली पेरणीवाया जाते.तसेच महागडे बियाणे व खतांचा अपव्यय होतो. त्यासाठी सुरुवातीचे मोठे पाऊस होऊन गेल्यानंतर, पूर्वमशागतीनंतर जमिनीची तहान पुरेशी भागल्यानंतरच खरीपाच्या पिकांची शेतकरी बांधवांनी पेरणी करावी.

- डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ

# पारधी समाजासाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेचे अर्ज स्वीकारण्याची मुदत २६ जून

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती**,प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धारणी कार्यक्षेत्रांतर्गत पारधी पॅकेज योजना सन २०२४-२५ अंतर्गत मंजूर योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकडून योजनेचे अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. २६ जून २०२५ आहे.वैयक्तिक लाभाच्या योजनांचे अर्ज धारणी, चिखलदर, अंजनगाव व अचलपूर, तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय, धारणी जि. अमरावती या ठिकाणी व नांदगाव खंडेश्वर, भातकुली, अमरावती, चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे व दर्यापूर तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती येथे तसेच मोर्शी, वरूड, तिवसा व चांदूर बाजार तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी प्रकल्प एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी अंतर्गत उप कार्यालय मोर्शी येथे विहित नमुन्यात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी या कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०७२२६-२२४२१७ या क्रमांकावर संपर्क साधावा. योजनेचा अर्ज भरतांना आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची माहिती अर्जाच्या नमुन्यावर नोंदविण्यात आली आहे.वैयक्तिक लाभाच्या योजना पारधी विकास कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश आहे. यामध्ये पारधी समाजाच्या बचत गटांना ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, लाभार्थ्यांना शेळी गट खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, लाभार्थ्यांना ऑटो रिक्षा पुरविणे या योजनांचा समावेश आहे. वरील योजनेसाठी शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अर्जाच्या जेष्ठतेनुसार संगणकीकृत यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर कागदपत्रे तपासणी करून पात्र व अपात्र अर्जदाराच्या स्वतंत्र याद्या तयार करण्यात येईल. लाभार्थी निवड करताना प्रथम दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, अपंग, वीरपत्नी, परितक्ता, निराधार, महिला यांना प्राधान्याने योजनेचा लाभ देण्यात येईल, अशी माहिती धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी दिली आहे.

# दहावी उत्तीर्ण असाल तर तात्काळ नोंदणी करा आणि सरकारी नोकरी मिळवा

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येक शिक्षित व्यक्ती रोजगाराच्या मागे धावतो आहे. त्यात शासकीय नोकरी मिळावी असा सर्वांचा प्रयत्न आहे. शासनाने दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार नोंदणी सुरू केली आहे. त्यामुळे तुम्ही जर दहावी उत्तीर्ण असाल तर लगेच नोंदणी करा आणि शासकीय नोकरी मिळवा.

दहावी उत्तीर्ण केल्यानंतर रोजगार कार्यालयात नोंदणी करणे हे खूपच महत्त्वाचे असते. यामुळे शासनाच्या विविध नोकरी व प्रशिक्षण संबंधित योजनांचा लाभ घेता येतो. नोंदणी केलेल्या उमेदवारांना शासकीय व खाजगी नोकरीच्या संधींबाबत वेळोवेळी माहिती मिळते. जिल्हा व राज्यस्तरावर आयोजित होणाऱ्या रोजगार मेळाव्यांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. रोजगार व स्वयंपूर्णतेसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांध्येही प्राधान्य दिले जाते. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना यांसारख्या योजनांचा लाभ घेण्यासाठी देखील नोंदणी आवश्यक असते. रोजगार कार्यालयाकडून नोंदणी क्रमांक व अनुभव प्रमाणपत्र मिळते. जे नोकरी मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते. स्पर्धा परीक्षा व भरती प्रक्रियेबाबत अपडेट्स मिळवण्यासाठीही ही नोंदणी फायदेशीर ठरते. त्यामुळे दहावीनंतर त्वरीत रोजगार कार्यालयात नोंदणी करणे हा सुजाण निर्णय ठरतो. यासाठी दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांनी महास्वयंम पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे.

### अशी करता येणार नोंदणी

विद्यार्थी नोंदणीचे टप्पे: http://www.mahaswayam.gov.in या अधिकृत पोर्टलला भेट द्या. रोजगार टॅबवर क्लिक करा.नोकरी शोधणारे लॉगिन / नोंदणी निवडा. पहिल्यांदा नोंदणी केल्यास रजिस्टर वर क्लिक करा. जसे की:नाव, जन्मतारीख, पत्ता, जिल्हा, तालुका शैक्षणिक पात्रता (इयत्ता दहावी), आधार क्रमांक, ईमेल आयडी आणि मोबाइल क्रमांक हा आवश्यक तपशील भरा. युजरनेम आणि पासवर्ड तयार करा. आपला फोटो आणि आयडी प्रूफ अपलोड करा. सबमिट केल्यानंतर तुम्हाला एक रजिस्ट्रेशन नंबर मिळेल. नंतर आपले रोजगार नोंदणी प्रमाणपत्र जतन करा किंवा प्रिंट करा.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक
गुरुवार दि. २२ मे २०२५
शहर/ग्रामिण

# जिल्ह्याला 'मनरेगा'चा १५ कोटी २८ लाखांचा निधी

## पालकमंत्र्यांच्या प्रयत्नांनी मजुरांना दिलासा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) जिल्ह्याला १५ कोटी २८ लाख रुपयांचा निधी दोन टप्प्यात प्राप्त झाला आहे. सदर निधी तालुकास्तरावर वितरीत करण्यात आला आहे. कामांची मजुरी थकीत असल्याने याबाबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यस्तरावर पाठपुरावा केला. त्यामुळे सुमारे ६३ हजार मजुरांना मोठा दिलासा मिळाला आहे.जिल्ह्यात सध्या ४ हजार ८४३ कामांवर ६२ हजार ९८३ मजूर कार्यरत आहे. निधीच्या कमतरतेमुळे मजुरांना अडचणींचा सामना करावा लागला. मनरेगाची अनेक कामे थांबली होती. आता हा निधी उपलब्ध झाल्याने कामे पुन्हा सुरू होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.उपलब्ध निधीपैकी अचलपूर ५७ लाख ४३ हजार, अमरावती ८३ लाख ५७ हजार, अंजनगाव सुर्जी ४२ लाख ६८ हजार, भातकुली ६१ लाख ११ हजार, चांदूर रेल्वे ६७ लाख २५ हजार, चांदूर बाजार १ कोटी २३ लाख २२ हजार, दर्यापूर ६९ लाख ३३ हजार, धामणगाव ९१ लाख, धारणी २४ लाख ९३ हजार, मोर्शी ६ कोटी २१ लाख ७१ हजार, नांदगाव खंडेश्वर ८९ लाख ४९ हजार, तिवसा ९० लाख ७७ हजार, वरुड १ कोटी ६ लाख ८८ हजार रूपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. चिखलदरा तालुक्याला याआधीच निधी वितरीत करण्यात आला आहे. मनरेगाचा निधी मिळालेला नसल्याने मजूरांअभावी असंख्य कामांना विलंब होत होता. तसेच मजुरांची अडचणी होत होती. तीन ते चार महिन्यांपासून मजुरी प्रलंबित असल्याने मजुरी मिळण्यासाठी पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्याकडे विनंती करण्यात आली होती. त्यानुसार पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या निर्देशाने जिल्हाधिकारी यांनी शासनाला थकीत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविला. निधी मिळविण्यासाठी पालकमंत्र्यांनी पाठपुरावा केल्याने जिल्ह्याला १५ कोटी २८ लाख रूपयांचा निधी ८ मे आणि १९ मे रोजी प्राप्त झाला आहे. सदर रक्कम मजुरांच्या खात्यात वळती करण्यात आली आहे. जिल्ह्याने आतापर्यंत एकूण २८ कोटी ६२ लाख रूपयांची मागणी केली आहे. उर्वरीत १३ कोटी ३४ लाख रूपयांचा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, असे रोहयो उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी कळविले आहे.

# ५९ गोवशांची वाहतूक करणारा कंन्टेनर पकडला



## समृध्दी महामार्गावर एलसीबीची दबंग कारवाई

## चौघांना अटकगोवंश व कंन्टेनरसह १३.८४ लाखांचा ऐवज जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** एलसीबीच्या पथकाने गडचिरोलीहुन समृध्दी महामार्गाव्दारे अमरावतीत दाखल होणारा ५९ गोवंश असलेला मोठा कंन्टेनर पकडून चौघांना अटक केली. लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या समृध्दी महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. आरोपींच्या ताब्यातून गोवंश व कन्टेनरसह एकूण १३ लाख ८४ हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.कय्युम नूरमहमद खान (४५)रा.टिपू सुलतान चौक, नागपुर, अजय शामलाल चौधरी (२७) रा. योगी अरविंदनगर, नागपुर, सलीम शेख अफ्तार शेख (४४) रा. राणीबाग तहसिल, नागपुर, मोहम्मद अहिर कुरेशी (४४) रा. महेंद्रनगर, टेगानाका, नागपुर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. गढचिरोलीहुन एका बंद कंन्टेरमध्ये मोठया प्रमाणात गोवंश समृध्दी महामार्गाहुन अमरावती जिल्ह्यात दाखल होणार असल्याची गोपनीय माहिती एलसीबीचे प्रमुख पीआय किरण वानखडे

यांना मिळाली. त्यानुसार एलसीबीचे प्रमुख पीआय किरण वानखडे यांनी त्यांच्या पथकातील पीएसआय गणेश शिंदे, लोणीचे ठाणेदार एपीआय सतिश खेडेकर, पीएसआय प्रविण मोरे इतर कर्मचाऱ्यांसह समृध्दी महामार्गावर शिताफीने सापळा रचला. दरम्यान पोलिसांनी आयसर कंपनीचा एच-४०-एके- ७५७३ क्रमांकाचा कंन्टेनर येतांना दिसला. पोलिसांनी कंन्टेनर चालकाला थांबविण्याचा इशारा केला असता तो भरधाव वेगाने पळून गेला. त्यामुळे पोलिसांनी सुमारे २ किमी थरारक पाठलाग करून अखेर कंन्टेनरला पकडले. पोलिसांनी कंन्टेनर उघडून पाहिला असता त्यामध्ये ३ लाख ६४ हजार रूपये किमतीची ५९ गोवंश मिळाले. त्यानुसार पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गोवंश, मोबाइल व कंन्टेनर असा एकूण १३ लाख ८४ हजाराचा ऐवज लंपास केला. सर्व आरोपींवर लोणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत लोणी पोलिस पुढील तपास करित आहेत.

# वेबसाईट ठप्प, पालकांना मनस्ताप, अकरावी प्रवेश प्रक्रियेचा पहिल्याच दिवशी फज्जा

## अमरावती विभागात १,८६, ४७५ प्रवेश क्षमता, पाच जिल्ह्यांमध्ये एकूण १ हजार ४२२ क. महाविद्यालय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** ८इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी राज्यभरात बुधवारी २१ मेपासून प्रत्यक्ष नोंदणी व पसंतिक्रम नोंदविणे प्रक्रिया सकाळी ११ वाजता सुरु होणार होती. मात्र, संकेतस्थळ सकाळपासून बंद असल्याने पहिल्याच दिवशी फज्जा उडाडा. तांत्रिक दुरूस्तीचे काम सुरु असल्याने प्रक्रिया सुरु झालेली नाही. नोंदणीसाठी विद्यार्थी, पालक ताटकळले आहेत. तर प्रक्रिया करण्यासाठी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतील नेमण्यात आलेले शिक्षकही गोंधळात पडले असून विद्यार्थ्यांसह पालकांना मनस्ताप सहन करावा लागला.

अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये एकूण १ हजार ४२२ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कला वाणिज्य, विज्ञान या तीन शाखांसाठी एकूण प्रवेश क्षमता १ लाख ८६ हजार ४७५ इतकी आहे.

अकोला जिल्ह्यात २६० कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कला शाखेत १३ हजार ९१५, वाणिज्य शाखेत ५ हजार २९५ आणि विज्ञान शाखेत १७ हजार ८०५, अशी एकूण ३७ हजार १५ प्रवेश क्षमता आहे. अमरावती जिल्ह्या तील ३१० कनिष्ठ महाविद्याल यांमध्ये कला शाखेत १८ हजार ६०, वाणिज्य शाखेत ५ हजार ८६० आणि विज्ञान शाखेत १७हजार २६०, अशी एकूण ४१ हजार १८० प्रवेश क्षमता आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ३४० कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कलाशाखेत १८ हजार ३७०, वाणिज्य शाखेत ६ हजार २२० आणि विज्ञान शाखेत २० हजार ५६० अशी एकूण ४५ हजार १५० इतकी प्रवेश क्षमता आहे. वाशीम जिल्ह्यातील १९५ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कला शाखेत १० हजार २७०, वाणिज्य शाखेत २ हजार २० आणिविज्ञानशाखेत १० हजार ९९० अशी एकूण २३ हजार २८० इतकी प्रवेश क्षमता आहे. यवतमाळ जिल्ह्यातील ३१७ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कला शाखेत २० हजार १२५, वाणिज्य शाखेत ४ हजार ९४५ आणि विज्ञान शाखेत १४ हजार ७८० अशी एकूण ३९ हजार ८५० इतकी प्रवेश क्षमता आहे.

### दिवसभर प्रवेश प्रक्रियेत अडथळा

शिक्षण विभागाने २०२५-२६ शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. २१ मेपासून २८ मेपर्यंतविद्यार्थ्यांना प्रवेशासाठीप्रत्यक्ष नोंदणीकरता येणार आहे. परंतु, पहिल्याच दिवशी बुधवारी सकाळी ११ वाजता सुरु होणारी प्रक्रिया काहीवेळ लांबली. संकेतस्थळाचे काम सुरु असून लवकरच सुरु होईल, असा संदेश येत असल्याचेही काही पालक, शिक्षकांनी सांगितले.

# दीड लाखाचे प्रतिबंधीत संशयित बियाणे जप्त

## पोलिस व कृषी कार्यालयाची धामणगाव रेल्वे तालुक्यात संयुक्त कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२धामणगाव रेल्वे,** रामगाव रस्त्यावरील एका शेतात १४५ प्रतिबंधित संशयास्पद कापूस बियाणे प्रशासनातर्फे जप्त करण्यात आले. गोपनीय माहितीच्या आधारेही कारवाई करण्यात आली. या बियाणांची किमत १ लाख ५७ हजार रुपये एवढी आहे. तालुका कृषी कार्यालयातर्फे प्रतिबंधित संशयास्पद कापूस बियाणे नमुने हे तपासणीसाठी नागपूर येथील प्रयोग शाळेत पाठविण्यात आले असल्याची माहिती आहे.तालुक्यातील रामगाव रस्त्यावरील एका शेतात प्रतिबंधित संशयास्पद कापूस बियाण्यांच्या संदर्भात दत्तापूर पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. दत्तापूर पोलिस ठाण्यातील पोलिस निरीक्षक गिरीश ताथोड यांनी तालुका कृषी कार्यालयाला माहिती दिली.या गोपनीय माहितीच्या आधारे दत्तापूर पोलिस व तालुका कृषी अधिकारी कार्यालयातर्फे प्रतिबंधित संशयास्पद कापूस बियाण्यांच्या ७ थैल्या जप्त करण्यात आल्या. यात प्रतिबंधित संशयास्पद कापूस बियाणेचे १७५ पाकिटांचा समावेश आहे. एका पाकिटाची किमत ९०१ रुपये असून १ लाख ५७हजार ६७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### नमुने नागपुरला पाठवले

प्रतिबंधित संशयास्पद कापूस बियाणे नमुने हे तपासणीसाठी नागपूर येथील प्रयोग शाळेत पाठविण्यात आले. नमुन्यांचेविश्लेषण अहवालप्रयोग शाळेतून प्राप्त होताच बी बियाणे अधिनियम १९६६, नियम१२६८ तसेच बियाणे नियोजन १९८३ अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.- **गजानन राऊत, (तालुका कृषी अधिकारी)**

# जिल्हाधिकारीपदावर आशिष येरेकर नियुक्त

## सौरभ कटियार मुंबई उपनगराच्या जिल्हाधिकारीपदी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती –** जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची बुधवारी २१ मे रोजी राज्य शासनाने बदली केली.त्यांच्या जागी नवे जिल्हाधिकारी म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहिलेले आशिष येरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर कटियार हे मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी पदाची सुत्रे हाती घेतील. एका आठवड्याच्या अंतराने शहरातील दोन प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. याआधी अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची नागपूर येथे बदली झाली आहे. नवे जिल्हाधिकारी आशिष येरेकर हे २०१८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून तरुण व तडफदार अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे. आयआयटी मुंबई येथून शिक्षण पूर्ण करणारे येरेकर हे महाराष्ट्र कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत.

# वाटमारी करणाऱ्याला बेलपुऱ्यातून अटक, दोघे पसार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती** रस्त्याने पायी जाणाऱ्या व्यक्तीला अडवून लुटमार करणाऱ्या टोळीतील एकाला शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्याच्या ताब्यातून दुचाकीसह मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच्या दोन साथिदारांचा शोध पोलीस घेत आहेत. रोहित शंकर खंडारे (वय २०, रा. बेलपूरा) असे अटकेतील लुटारुचे नाव आहे.

बोरगाव धर्माळे येथील रहिवासी जितेश श्रीधर पोहोकार (वय ३२) हा १८ मे रोजी दुपारी इर्विन चौक ते रेल्वे स्टेशन मार्गे पायी जात होता. तो दारू प्यायलेला होता. हे पाहून दुचाकीवर तीन युवक आले आणि पोहोकारला रस्त्यात अडवून त्याच्या खिशातील मोबाईल व रोख हिसकावून पसार झाले. घटनेनंतर पोहोकारने कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याघटनेत कोतवाली पोलीस व गुन्हे शाखेचे पोलीस समांतर तपासकरीत असताना त्यांना रोहित खंडारे याची माहिती मिळाली. बुधवारी (दि. २१) दुपारी त्याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता अन्य दोन साथीदाराच्या मदतीने लूटमारी केल्याची कबुली त्याने त्याच्याकडून या घटनेत वापरलेला मोबाईल व दुचाकी वाहन असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्याच्या दोन साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत.पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनात गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, उपनिरिक्षक प्रकाश झोपाटे, पोलीस अंमलदार सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउद्दी खतीब, आदीने ही ती कारवाई केली.

# दर्यापुरात खरीप हंगामासाठी कृषी केंद्र चालकांची बैठक

## जिल्हा स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले मार्गदर्शन



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२२दर्यापूर –** कृषि विभागाचे वतीने पंचायत समितीच्या सभागृहात तालुका कृषी निविष्ठा विक्रेता यांचे बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या बैठकीला कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. या बैठकीला जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एम.जे.तोडकर प्रामुख्याने उपस्थित होते. अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी कालीदास तापी, अचलपुर उपविभागीय कृषी अधिकारी प्रफुल्ल सातव, तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, सहाय्यक गटविकास अधिकारी चंद्रशेखर ढवक, कृषी केंद्र चालक संघटना दर्यापूरचे अध्यक्ष श्रीकृष्ण काळमेघ आदी व्यासपीठावर उपस्थित होते. केंद्र संचालकांनी शेतकऱ्यांना सेवा द्यावी कारण नावामध्येच 'कृषी सेवा आहे. त्यामुळे हे विसरुन चालणार नाही. कृषी केंद्र संचालकांनी साठेबाजी करु नये, त्यासाठी साठा फलक व भावफलक अद्यावत ठेवावा. जेणेकरुन सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावावा. जेणे करुन सर्व माहिती शेतकऱ्यास होईल. तसेच शेतकऱ्यांनी एकाच प्रकारचे बियाणे व खतांसाठी आग्रह धरु नये त्यावर पर्याय शोधावा व शेतकऱ्यांना दुसरे बियाणे व खतांसाठी प्रवृत्त करावे असे कृषी निविष्ठा विक्रेत्यांना कृषी विकास अधिकारी एम.जे.तोडकर यांनी सुचीत केले. पुढे बोलतांना कापुस बियाणे राशी स्विफ्ट, युएस ग्री – ४७०८, अंकुर, किर्ती इत्यादी पर्यायी वाण व रासायनिक खते, डि.ए.पी.ला पर्याय जसा ( ट्रिपल सुपर फॉस्फेट बॅग युरिया ) मिसळुन डिएपी खताच्या टंचाईवर मात होईल. असे कृषि विकास अधिकारी तोडकर यांनी निविष्ठा विक्रेत्यांना शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्याबाबत संबोधीत केले.

# अमरावतीमध्ये धुव्वाधार पाऊस, रस्त्यावर पाणीच पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** अखेर , अमरावतीमध्ये मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली आहे. बुधवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास अमरावतीमध्ये धुव्वाधार पाऊस कोसळला. एक तास बरसलेल्या या पावसामुळे अमरावतीकरांना दिलासा मिळाला, पण पावसामुळे अनेक भागातील दुकानांमध्ये पाणी शिरले आणि अर्धे शहर अंधारात बुडाले. त्याच वेळी, नाल्यांमध्ये साचलेला कचरा पाण्यासोबत रस्त्यावर वाहू लागल्याने वाहनांना मार्ग शोधणे कठिण झाले होते.हवामानखात्याने २१ ते २४मे दरम्यान महाराष्ट्रातील अनेक भागात, विशेषतः विदर्भात, वादळ आणि जोरदार वाऱ्यांसहमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

अरबी समुद्राजवळ चक्रीवादळ निर्माण झाल्यामुळे हवामानात हा बदल होत आहे, जो २२ मे पर्यंत कमी दाबाच्या क्षेत्रात बदलू शकतो.बुधवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे उष्णतेपासून दिलासा मिळाला, परंतु महानगरपालिकेने नाले आणि ड्रेनेज सिस्टीमची साफसफाई न केल्यानेअमरावतीतील लोकांना समस्यांना तोंड द्यावे लागले.

### दुकानांमध्ये पाणी शिरले

बुधवारी रात्री ८ वाजता सुरूझालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक दुकानांमध्ये पाणी शिरल्याची माहिती आहे. शिवाय, नाल्यांमध्ये साचलेला कचरा रस्त्यावर वाहून जात असल्याने लोकांनाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. या पावसाने महापालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेचा पर्दाफाश केला आहे.

### अर्धे शहर अंधारात बुडाले

वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात धुव्वाधार पाऊस बरसल्यामुळे अर्धे शहर अंधारात बुडाले होते आणि वृत्त लिहिताना रात्री उशिरापर्यंत शहरातील अनेक भागात वीजपुरवठा पूर्ववत होऊ शकला नव्हता. महावितरणचे कर्मचारी रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात व्यस्त होते.



### मे महिन्यात जास्त पाऊस पडण्याची शक्यता

हवामान खात्याने २४ मे पर्यंत पावसाचा अंदाज वर्तवला आहे हे ज्ञात आहे. त्यामुळेयावर्षी मे महिन्यातविदर्भात सामान्यपेक्षा जास्त मान्सूनपूर्व पाऊस पडण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागू शकते. पावसात भिजल्याने शेतात उभे किवा कापलेले पीक खराब होण्याची शक्यता आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

---

# महादेवखोरी व मंगलधाममधे सुरळीत पाणी द्या

## माजी नगरसेवक आशिष गावंडे यांची मागणी

## परीसरातील नागरिकांची मजीप्रावर धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती –** शहराच्या महादेवखोरी, पन्नी कॉलनी, प्रिया कॉलनी, न्यूप्रियाकॉलनी, गजानन नगर नंबर एक, गजानन नगर नंबर २, हिल टॉप कॉलनी, अंकिता विहार, मयूर रेसिडेन्सी, गौरीशंकर नगर, मंगलधाम कॉलनी, निळकंठ लेआउट, उबन विहार, कैलास नगर व शेजारील परिसराच्या नागरिकांना दर दिवशी पाण्यासाठी चांगलीच कसरत करावी लागते. या भागात सुरळीत व नियमित पाणी पुरवठा करण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन माजी नगरसेवक आशिष गावंडे यांच्या नेतृत्वात महादेवखोरी व मंगलधाम परिसरातील संतप्त नागरिकांनी मजिप्रा अधिकाऱ्यांना दिले.

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू असताना सुद्धा नागरिकांना विशेष करून महिला भगिनींना पाणी मिळत नाही. उन्हाळा सुरू असल्यामुळे या तपत्या उन्हामध्ये सगळीकडे पाण्यासाठी त्राहिमाम सुरू असतो. वापरायलातरनाहीच, पणपिण्यासाठीसुद्धा लोकांना पुरेसे पाणी मिळत नाही. पाणीपुरवठा विभागाकडून रीतसर वेळोवेळी पाणी सोडल्या जात नाही. अनेक वेळा तर रात-बेरात पाणी सोडल्यामुळे नागरिकांची फजिती होते. नागरिकांच्या समस्यांची गांभीर्याने दखल घेत आशिषगावंडे यांच्या नेतृत्वावर मजीप्रावर धडक देण्यात आली. नागरिकांच्या समस्यांचे निराकरण न केल्यास येत्या काही दिवसांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी मोठे जन आंदोलनकरू असेही ठणकावून सांगितले. यावर कार्यकारी अभियंता सोळंके यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित केले. याप्रसंगी वृषाली मंडवघरे, संगीता ठाकरे, रेणुका देशमुख, पार्वती मेश्राम, पंकज चोपडे, सुनिता कोळमकर, विनोद काळे, रणजीत मेश्राम, अमोल पवार, भावना सहारे, डोंगरे, गजभिये, अर्चना पाटील, मधुकर सहारे, स्वानंद पहुरकर, बंडू खडसे, इंगोले, मंजू काळबांडे, लताबाई काळबांडे, वाहने, संगीता पळसकर, राजश्री बोरकर तसेच गजानन नगर, महादेव खोरी व मंगलधाम परिसरातील नागरिक उपस्थित होते.-



---

# शेगाव रहाटगाव अंतर्गत कठोरा नाका परिसरातील पाण्याचा प्रश्न मिटणार

## धिरज बारबुध्दे यांच्या आंदोलनाला मोठे यश



### जीवन प्राधिकरण कडून सर्व समस्या निकाली काढण्यासाठी लेखी आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
स्थानिक प्रभाग क्रमांक एक शेगाव रहाटगाव अंतर्गत कठोरा नाका परिसरातील किमान पन्नास कॉलनींमधे पिण्याच्या पाण्याची गेल्या साधारण दिड दोन वर्षापासुन प्रचंड समस्या निर्माण झाली होती ज्यासाठी भाजप शहर उपाध्यक्ष धिरज बारबुध्दे व नागरिकांकडून अनेकदा अधिका-यांना यासाठी समस्या निकाली काढण्यासाठी वारंवार विनंती,पाठपुरावा करण्यात येत होता,परंतु समस्येवर काहीही निराकरण निघत नसल्याने आज धिरज बारबुध्दे यांच्या नेतृत्वात परिसरातील शेकडो महिलांसह नागरिकांकडून घागर मोर्चा काढण्यात आला,यावेळी जीवन प्राधिकरण चे वरिष्ठ अधिकारी लोखंडे सहित सर्वच अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.साधारणत: तीन ते चार तास चाललेल्या आंदोलनानंतर आंदोलक व अधिकारी यांचेसोबत झालेल्या चर्चेनंतर व आंदोलकांचा आक्रमक पवित्रा पाहून शेवटी जीवन प्राधिकरण चे अधिका-यांनी आंदोलकांच्या सर्व मागण्या मान्य करून तसे लेखी पत्र धिरज बारबुध्दे व नागरिकांना दिले व अभूतपूर्व आंदोलनाला मोठे यश प्राप्त झाले.यावेळी भाजप शहर उपाध्यक्ष धिरज बारबुध्दे,मंडळ अध्यक्ष छोटूभाऊ वानखडे ,राजाभाऊ घोंगडे,डॉ.धनराज चक्रे,आकाश जाधव,अमोल भाकरे,विनोद चोखट,अंबादासराव जयसिंगकर,जयंतराव देशमुख, क्रिष्णराव पाटील, राजाभाऊ भूयार,गजाननराव घायसूंदर, पंजाबराव वंजारी, किशोरराव इंगोले, चाफले सर,खराटे काकू, प्रितीताई काकडे,तेलखडे ताई,उज्वलाताई घोंगडे सह परिसरातील शेकडोंच्या संख्येत महिला व नागरिक उपस्थित होते.

---

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचा २५ ला मेळावा

## वामनराव चटप यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती –** विदर्भ राज्य आंदोलन समिती अंतर्गत शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार मध्यम वर्गीय कुटूंबातील उच्चशिक्षीत, अर्हताप्राप्त कंत्राटी व तासिका तत्वावरील शिक्षक आणि रोजी अभियंता भवन येथे विदर्भराज्य आंदोलन समितीच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नागपुर येथून विदर्भप्रेमी बाबा शेळके यांच्या नेतृत्वात विदर्भसंकल्प पदयात्रा निघाली असून ती २५ मे रोजीच अमरावतीला पोहोचणार असल्याची माहिती विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष वामनराव चटप यांनी दिली. राजापेठस्थित श्रमिक पत्रकार पत्रपरिषदेत माहिती देताना वामनराव भवन येथे बुधवारी (ता. २१) पत्रकार परिषदेत सांगितले की, या मेळाव्याला अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले, दैनिक मतदारचे संपादक ॲड. दिलीप एडतकर, बुंदेलखंड आंदोलनाचे सुत्रधार राजा बुंदेला, भास्कर पेरे पाटील, अरविंद जगताप, भारत गणेशपुरे, नुटाचे प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ. राजीव सदन, जयदिप सोनखासकर, अविनाश बोराळे, प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ. महेंद्रमेटे, डॉ. सुभाष गवई, ॲड. वामनराव चटप, दै. देशोन्नतीचे प्रबंध संपादक प्रकाश पोहरे, विदर्भ विरांगणा रंजना मामर्डे, उद्योजक नितीन मोहोड, अरुण केदार, प्राचार्य डॉ. पीआर राजपूत, प्रा. प्रभाकर कोंडबत्तुनवार, प्रा. डॉ. एकनाथ तट्टे, सरपंच संघटनेचे संस्थापक गजानन बोंडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे, राजेंद्रसिंह राजपूत, सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे अध्यक्ष डीआर देशमुख, रजिया सुलताना, मुकेश मासुकर, प्रा. डॉ.वंदना काकडे, प्रा. एसपी हिवाळे, सीए सुनील धोखारे, अहमद कादर, डॉ. सत्येंद्र गडपाले, ॲड. निरज खांदेवाले, शिव काळे, राजेंद्र आगरकर, सुषमा मुळे, गणेश कुसराम, ॲड. सुरेश वानखडे, राजेश पिदडी, प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. प्रिती गवई उपस्थित राहणार आहे.वामनराव चटप यांनी सांगितले की, नागपुर कराराप्रमाणे त्यांच्या हक्काचा ३ टक्के विकासनिधी, उद्योग व नोकऱ्या कधीच मिळाल्या नाहीत. त्यामुळे विदर्भातील माणसाचे माणूस म्हणून जगणे दुरापस्त झाले आहे. आज महाराष्ट्र राज्य आकंठ कर्जात बुडाले असून अक्षरशः दिवाळखोरीच्या मार्गावर आहे. त्यामुळे आर्थिक जबाबदाऱ्या पेलणे या राज्याचे एक दिवास्वप्न झाले आहे. या सर्वाला एकच उत्तर म्हणजे वेगळा विदर्भ आहे. या मेळाव्याला शेतकरी संघटना, नुटा, विजुक्टा, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, भारतीय संविधान क्रांति दल, अध्यापकसभा, टीचर्स डेमोक्रेटिक फ्रंट, सरपंच संघटना, स्वराज्य सेवा प्रतिष्ठान, इंटक, विदर्भ ऑटो युनियन, जेष्ठ नागरिक संघ, पेन्सनर्स संघटनेने पाठिंबा दिला आहे. या मेळाव्यात अधिकाधिक संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. पत्रकार परिषदेला रंजना मामर्डे, नितीन मोहोड, राजेंद्र आगरकर, प्रकाश लढा, डॉ. विजय कुबडे, रियाज खान, प्राचार्य डॉ. पीआर राजपूत उपस्थित होते.



---

# अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्याअध्यक्षपदी महंत कारंजेकर बाबांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** महाराष्ट्र सरकार, प्रशासन ते मंत्रालयापर्यंत थेट संपर्क असणारे विदर्भातील 'महानुभाव रत्न' कविश्वर कुलाचार्य आचार्यप्रवर महंत श्रीकारंजेकरबाबाजी महानुभाव (अमरावती) यांची अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

वर्तमानातील महानुभाव पंथाला विकासाच्या दृष्टीने एक नवा आयाम प्राप्त करुन देणारे, पंथातील अनेक प्रलंबित प्रश्नांना मार्गी लावून विकासाद्वारे गतिमानकरण्यासाठी कविश्वर कुलाचार्य महंत कारंजेकर बाबा सतत प्रयत्नशील असतात. तसेच पंथातील सामाजिक, धार्मिक विषयावर सर्वसमावेशक निर्णय घेऊन पंथाच्या संवर्धनासाठी सक्षमपणे निर्णय घेण्यात महंत कारंजेकर बाबांचा नेहमीच पुढाकार असतो. पंथातील तिर्थस्थाने, मठ मंदिरे यांच्या विकासासाठी महाराष्ट्र सकारच्या माध्यमातून सदैव कार्यरत आणि संपर्कात असतात. विशेष म्हणजे रिद्धपूर येथील मराठीभाषा विद्यापीठाच्या स्थापनेतही त्यांचा शासनदरबारी पाठपुरावा महत्वपूर्ण मानल्या जाते. विविध धर्मरुप कार्य सेवेतून पंथाला एक नवीन दिशा देऊन पंथाला विकासाच्या माध्यमातून गतिमान करणारे कार्यक्षम व्यक्तीमत्व अमरावती निवासी आचार्यप्रवर श्रीबाबाजीयांची अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



---

# शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचे सह नं.प. वर नागरिकांची धडक

## महिन्याकाठी स्वच्छतेवर लाखो रुपयांची उधळण, तत्काळ सुधारणा करा, अन्यथा तीव्र आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ नांदगाव खंडे,–** शहरात दुषित पाणी पुरवठा आणि स्वच्छतेची ऐशी तैशी झाली असून शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. थातुर मातुर साफसफाई करून कंत्रादार मनमानी कारभार करीत असल्याचा आरोप करीत शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी नागरिकांसह नगर पंचायत कार्यालयात धडक दिली. यावेळी मुख्याधिकारी यांना घेराव करून तात्काळ दुषित पाणी पुरठ्यात सुधार करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा निवेदन सादर करून दिला.

नियमित व स्वच्छ पाणी पुरविणे तसेच शहरातील कचरा, नाल्या वेळोवेळी साफ-सफाई करणे हि कामे नगर पंचायतची आहे. स्वच्छतेवर महिण्याकाठी लाखो रुपये खर्च केल्या जात असून शहरात सगळीकडे अस्वच्छता व घाणीचे साम्राज्य राज्य पसरले आहे. नगर पंचायत साफ-सफाईकडे दुर्लक्ष करीत आहे. मात्र महिण्याला लाखो, रुपये कंत्राटदाराचे घशात जात आहे. शहरातील काही भागात अद्यापही कचऱ्याची घंटा गाडी जात नाही. चारचं कचरा गाडीवर संपूर्ण शहराची मदार आहे.पावसाळा तोंडावर असून नाली साफ- सफाईची कामे करण्यात आली नाही. तसेच शहरातील अनेक भागात गढूळ पाणी पुरवठा होत असून त्यातही दहा दिवसाआड होणारा पाणी पुरवठा दुषित होत असल्याने नागरिक चांगलेच संतप्त झाले आहे.त्यामुळे संतप्त नागरिकांनी नगर पंचायत कार्यालयावर धडक देऊन अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत आंदोलनाचा ईशारा दिला. यावेळी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर श्रीकृष्ण सोळंके, रवि ठाकूर , प्रकाश ब्राम्हणवाडे, बाबाराव राऊत, अजय जेवडे, जयंत सुने विजय पेटले, लीलाधर चौधरी, उमेश उडबगले, अनिल बिटले, मारोती मडके, सूरज लोमटे , सूरज पवार, कुणाल रावेकर संदीप काकडे इत्यादी नागरिक उपस्थित होते.-



# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राडा

## युवकाच्या हत्येचा प्रयत्न : रिल व्हायरल प्रकरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अचलपूर येथील शासकीय तंत्रनिकेतनच्या काही विद्यार्थ्यांची शुटिंग घेऊन कॉलेजच्या खासगी इन्स्टाग्रामवर रिल व्हायरल केल्याप्रकरणी समजूत काढण्यास गेलेल्या युवकावर प्राणघातक हल्ला करून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न झाला.


तुषार ईश्वर अपार (वय १९, रा. कविठा रोड, कांडल्ये, परतवाडा), असे हल्ल्यातील गंभीर जखमी युवकचे नाव आहे. टीव्ही टॉवर चौक, परतवाडा येथे हा हल्ला झाला. बखमीच्या तक्रारवरून परतवाडा पोलिसांनी संशक्ति आदित्य डोबाळे (रा. अकोट), किला शुक्ला (वय २०, रा. परतवाडा), पचूप काकड (वय २०, रा. जळगाव जामोद), तुषार नवघरे (वय २१, रा. परतवाडा), अशी

गुन्हा दाखल झालेल्या चौघांची नावे असून त्यापैकी किश्ना, पीयूष आणि तुषार या चौघांना परतवाडा पोलिसांनी गुन्ह्यात अटक केली आहे. आदित्य डोवाले व पीयूष काकड, या दोघांनी त्यांच्यासह काही वर्गमित्रांचे फोटो असलेला व्हिडिओ बनवून इन्स्टाग्राम ॲपवर 'मेरा बेटा इंजिनियर बनेगा' या नावाने रिल तयार करून कॉलेजच्या खासगी इन्स्टआम ग्रुपवर पोस्ट केले होते. हा व्हिडिओ डीलिट करण्यासाठी तुषार अपार या विद्यार्थ्याने मध्यस्थी केल्याच्या कारणावरून बदला घेण्याचे संशक्तिनी ठरविले. तुषार अपार हा शासकीय तंत्रनिकेतन अचलपूर येथील महाविद्यालयातून दुचाकीने रूमकडे निघाला असता संशयित आदित्य व किश्ना या दोघांनी तुषार याच्याच दुचाकीवर बसवून त्याला अंजनगाव मार्गावरील एका शेतात नेले. तेथे अन्य संशयित तुषार नवघरे व पीयूष, असे दोघे आधीच थांबले होते. आधी चौघांनी तुषार ईश्वर अपार यास जबर मारहाण केली. एकाने लोखंडी कड्याने बार केला. त्यानंतर तुषार अपार याची हत्या करण्याच्या उद्देशाने चौघांनी त्याचा गळा दाबला. त्यानंतर संशयित चौघांनीच पीडित जखमी तुषार अपार यास रुग्णालयात नेतो, असे म्हणून त्याच्याच फ्लॅटवर नेले. तेथेही चौथा संशयितांनी अपार यास बेदम मारहाण केली. खून करण्याचीही धमकी दिली, असा आरोप जखमी तुपार अपार यांनी परतवाडा ठाण्यात दाखल तक्रारीत केला आहे. त्या आधारे चौघा संशयितांविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

# अमरावती जिल्ह्यात बियाण्यांची तस्करी वाढली

## कारवाईत साडे पाच लाखांचे बोगस बियाणे जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**



महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या एचटीबीटी बियाण्यांची तस्करी प्रामुख्याने गुजरातमधूनच होत असल्याचे कृषी विभागाने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीतून अधोरेखित झाले आहे. याप्रकरणात दाखल गुन्ह्यांमध्ये शिक्षेचे प्रमाण अल्प असल्याने व पोलिस विभागाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने तस्करी रोखण्यात व त्यावर नियंत्रण मिळवण्यात कृषी विभाग हतबल झाला आहे.

अमरावती जिल्ह्यात प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे जप्तीच्या पाच कार्यवाही करण्यात आल्या आहेत. यात प्रतिबंधित ४७४ पाकिटे जप्त करण्यात आली असून त्याची किंमत पाच लाख ५५ हजार ६६२ रुपये डीहै. कृषी विभागाच्या भरारी पथकाने येवदा येथे पहिली कारवाई केली. या कारवाईने जिल्ह्यातील एचटीबीटीचा प्रवेश अधोरेखित केय. त्यानंतर अमरावती शहरातील वेलकमपॉइंट, अंजनगावसुर्जी, पोटनजीकच्या जनूना व धामणगावरेल्वे येथे तस्करी करून विक्रीसाठी आणलेले बियाणे जप्त करण्यात आले.

खरीप हंगामातील कपाशी हे मुख्य पीक असून एचटीबोटी वागांच्या बियाण्यांची उत्पादनाची सरासरी अधिक असल्याने शेतकऱ्यांचाही कल या बियाण्यांकडे अधिक आहे. मात्र राज्यात या बियाण्यांवर प्रतिबंध असल्याने ते खुल्या बाजारात मिळत नाही. या बियाण्यांच्या उत्पादक कंपनी गुजरातमधे अधिक असल्याने तेथून तस्करीने बियाणे आणली जातात. महाराष्ट्रात या बियाण्यांवर बंदी असल्याने हंगामापूर्वी कृषी विभागाला त्यासाठी दक्ष राहावे लागते. भरारी पथक स्थापन करून नियंत्रणासह तस्करी रोखण्याचा प्रयत्न केल्या जातो. गतवर्षीही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असली तरी याप्रकरणात शिक्षेची कठोर कारवाई न झाल्याने तस्करांचे मनोबल वाढले आहे. पोलिस विभागाकडून याप्रकरणात पुढील तपास अपेक्षित आहे.

# दिवसा घरफोडी करणारी पती-पत्नीची टोळी जेरबंद : ५ गुन्ह्यांची कबुली, सोनारासह तिघे अटकेत, ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती**

दिवसा घरफोडी करणाऱ्या एका पती-पत्नीच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणच्या पथकाने जेरबंद केले असून, चोरीच्या दागिन्यांची खरेदी करणाऱ्या सोनारासह तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून ११,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ८ मार्च रोजी चांदुर रेल्वे येथील साईनाथ कॉलनीतील बेबीताई महाजन यांच्या घरी ४.८ लाखांचे दागिने चोरीला गेले होते. याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आरोपींबाबत गुप्त माहिती मिळाली. पुलगाव बस स्थानक



परिसरातून सिमा ऊर्फ हेमा परवीन शेख नसीम (४५) व तिचा पती शेख नसीम शेख सलीम (४०, दोघे रा. सादीया नगर, अमरावती) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी चांदुर रेल्वेसह तिवसा, धामणगाव रेल्वे, दर्यापूर आणि मोझरी येथील दिवसा घरफोड्यांची कबुली दिली. त्यांनी चोरीचे दागिने अमरावतीतील प्रफुल सुधाकरराव पाठक या सोनाराकडे २.९१ लाखांना विकल्याचे मान्य केले. पोलिसांनी पाठकालाही अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात पो.नि. किरण वानखडे, पो.उप.नि. मोहम्मद तस्लीम, मुलचंद भांबुरकर आणि त्यांच्या पथकाने केली.

# शेती कसायची की सोडून द्यायची?

## निसर्गाची साथ नाही, वन्यप्राणीही उठले जीवावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**



दिवसेंदिवस वाढत्या महागाईमध्ये सर्वसामान्य शेतकऱ्यांचे चांगलेच कंबरडे मोडले आहे. गरिबापासून श्रीमंतांपर्यंत सर्वांची भूक शेतकरीच भागवीत असतो, पण ती भूक भागविण्यासाठी बळीराजाला किती हालअपेष्टा सहन कराव्या लागतात, याचा विचार कोणीही करत नाही. आज शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक साहित्यांच्या किमतीत झपाट्याने वाढ होत आहे. शेतीसाठी खर्च जास्त आणि उत्पादन कमी, त्यातच वन्य प्राण्यांमुळे डोकेदुखी अशा विविध कारणांमुळे आज शेतकरी चिंतेत पडला आहे. त्यामुळे शेती व्यवसाय करायचा की सोडून द्यायचा, अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.

स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, रात्री बे रात्री शेतात जाऊन शेतकऱ्याला जागल करावी लागते. उत्पन्नाच्या योग्य रीतीने भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याचा लागवडीच्या खर्चही न निघता, पुन्हा स्वतःच्या खिशातून शेतकऱ्यांना देणं-घेणं करण्याची वेळ येत आहे. अगोदरच शेतीसाठी शेतकऱ्यांनी कर्ज काढले आहे आणि त्यातच उत्पादन व अल्पभाव मिळत असल्याने शेतकरी कर्ज फेडेल तरी कसा, असा विचार शेतकरी करीत आहे.

शेतकऱ्यांच्या कुटुंबातही शिक्षणाची मुले आहेत. त्यामुळे त्यांचे शिक्षणही शेतकरी शेतीच्या भरवशावर करत असतो. दुसरीकडे पिकांचे उत्पादन झाले, तर भाव नाही आणि भाव आहे तर उत्पादन नाही, अशी बिकट अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.बाजारपेठेत योग्य प्रतीचा भाव मिळत नसल्याने, उत्पादनाचा खर्चही शेतकऱ्यांचा निघत नाही आणि त्यामुळे उत्पादन खर्चासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड शेतकऱ्यांकडून होत नाही. बँकांकडून घेतलेल्या कर्जासाठी कर्मचारी शेतकऱ्यांच्या घरावर येत आहेत. त्यामुळे शेतकरी मानसिक संकटात सापडला आहे. नुकत्याच मार्च महिन्याच्या शेवटी शेतकऱ्यांनी विविध सोसायटीचे कर्ज परत करण्यासाठी इतर ठिकाणांतून कर्ज घेतले आहे. त्यामुळे एकंदरीत चोहोबाजूंनी शेतकऱ्यांची आर्थिक व मानसिक कोंडी होत आहे.

शेतीशी निगडीत व्यवसाय उठला जीवावर(बोल्ड करणे)हताश शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून गाई, म्हशी, शेळ्या, कोंबड्या सोबतच मत्स्य व्यवसाय करीत असतात, परंतु पाळीव जनावरांवर वन्य प्राण्यांचे जीवघेणे हल्ले होत आहेत. एवढेच नाही, तर रात्रीच्या सुमारास कोंबड्यांसह शेळ्या चोरी जाण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. त्यामुळे शेतकरी वर्ग हतबल होत आहे.

रासायनिक औषधे आणि खतांचे भाव गगनाला(बोल्ड करणे)शेतात राबणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवसकमी होत चालली आहे. त्यामुळे शेतात कोणतेही काम करण्यासाठी मजूर वर्ग मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना जास्त तणनाशकाचा वापर करावा लागतो. रासायनिक औषधे आणि खतांचे भाव आजच्या काळात गगनाला मिळाले आहेत. तणनाशकाच्या दरात वाढ झाली आहे. परिणामी याचा भूर्दंड बळीराजाच्या मानगुटीवर बसत आहे. परिणामी आर्थिक स्थिती कमजोर होत आहे.

# ढगात विजांचा कडकडाट; तुमचा टीव्ही, फ्रीज सांभाळा : महावितरणचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

उन्हाळा संपून मान्सून दाखल होण्याच्या मार्गावर आहे. पावसासोबत वादळी वाऱ्यांचे आगमन होते. अशावेळी वीज यंत्रणेत अचानक लोड वाढणे, शॉर्टसर्किट होणे यामुळे काहींच्या घरातील फ्रीज, टीव्ही यासारखी विद्युत उपकरणे जळतात. गोंदिया शहर व ग्रामीण भागात दरवर्षी अशा घटना घडतात. हे नुकसान टाळण्यासाठी प्रत्येकाने घरातील यंत्रणा तंदुरुस्त ठेवण्याचे आवाहन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.महावितरणची वीज वहन यंत्रणा बंदिस्त नसते. त्यामुळे वादळ वाऱ्यात त्याचे नुकसान होते. झाडे पडून विजेचे खांब वाकतात, तर कुठे वीज वाहिन्या तुटून खाली येतात. ११ केव्हीचा पडलेला एक खांब उभा करण्यात एकदिवस निघून जातो. तोपर्यंत वीजपुरवठा खंडित असतो.



### ग्राहकांनी काळजी घ्यावी

ओव्हरलोडमुळे घरात ठेवलेली वीज उपकरणे खराब होऊ शकतात किंवा काही परिस्थितीत आग लागू शकते. संभाव्य अपघात टाळण्यासाठी, ओव्हरलोडपासून उपकरणांचे संरक्षण करण्यासाठी योग्य फ्यूज किंवा एमसीबी (मिनिएचर सर्किट ब्रेकर), ईसीएलबी (अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर) यांचा वापर करणे आवश्यक असते.इलेक्ट्रिक सर्किटमध्ये ओव्हरलोड असतो तेव्हा फ्यूज आणि एमसीबी विजेचा प्रवाह खंडित करतात. ओव्हरकरंटचे मुख्य कारण शॉर्टसर्किट किंवा ओव्हरलोड असू शकते.

पावसाळ्यात नेहमी वादळवाऱ्यामुळे वीज खांब व वाहिन्यांची तुटफूट होते. अशा घटनांच्या वेळी शॉर्टसर्किट होण्यासह वीज दाब अचानक वाढू शकतो.

# महिला लिपिकाला अश्लील टिप्पणी करणाऱ्याविरोधात गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अचलपूर**

कांडली परिसरातील पांडुरंग नगरातील रहिवासी व मेळघाट वन्यजीव विभागात लिपिक म्हणून कार्यरत विवाहित महिलेचा अज्ञात तरुणाने पाठलाग करून अश्लील भाष्य केल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दिली.सोमवारी १९ मे रोजी त्या कार्यालयातून घरी परतत असताना सरस्वती नगर ते पांडुरंग नगर दरम्यान त्यांच्या ॲक्टिव्हा गाडीच्या मागे एक युवक पल्सर मोटारसायकलने पाठलाग करत होता. त्यांनी मागे वळून पाहिल्यावर या तरुणाने अश्लिल व लज्जास्पद वक्तव्य केले. महिलेने पतीला माहिती दिली. पतीने घटनास्थळावरून पसार आरोपीचा पाठलाग करून त्याला रिद्धी सिद्धी मंदिराजवळ पकडले. त्यानंतर आरोपीस पोलिसांच्या स्वाधिन केले. आरोपीचे नाव राजेश दादाराव पळसपगार (रा. हिरापूर जळका, ता. भातकुली, जि. अमरावती.) असे आहे. त्याच्याविरुद्ध महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी महिलेने तक्रारीत केली आहे.

# वाघाच्या हल्ल्यात इसम ठार, बारा दिवसात नऊ बळी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चंद्रपूर**

मूल तालुक्यातील करवन येथे वाघाच्या हल्ल्यात बंडू उराडे या इसमाचा मृत्यू झाला. सदर घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. बारा दिवसात वाघाने एकूण नऊ जणांचा बळी घेतल्याने भिती व दहशतीचे वातावरण आहे. मुल तालुक्यात सध्या वाघाने धुमाकूळ घातला आहे. तेंदूपत्ता हंगाम सुरू असल्याने ग्रामस्थ जंगलात तेंदूपत्ता तोडण्यासाठी जातात आणि वाघाचे लक्ष ठरत आहे. करवन येथील बंडू उराडे हा जंगलात तेंदुपत्ता सोडण्यासाठी गेला होता. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला असता त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ व वन अधिकारी घटनास्थळी पोहचले आहेत.

# लप्पीभैय्या जाजोदिया यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा......






प्रसिध्द समाजसेवक तथा उद्योजक चंद्रकुमार उर्फ लप्पीभैय्या जाजोदिया यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी आज साजरा करण्यात आला. शारदानगर येथील मधुकूंज निवास स्थानी मान्यवरांसह चाहत्यांची गर्दी उसळली होती. माजी खासदार नवनीत रवि राणा यांनी चंद्रकुमार जाजोदिया यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या. भाजप शहर अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी हि शुभेच्छा दिल्यात.लप्पीभैय्या जाजोदिया यांनी वाढदिवसानिमित्त सर्व संतांची गुड तुला हि आज करण्यात आली.वाढदिवसानिमित्त अंबादेवी व एकविरा देवी मंदिरामध्ये महाआरती करण्यात आली

# कुठल्या पिकाला खत काय ? 'कृषिक' ॲपवर कळणार घरबसल्या खतांची माहिती : कृषी विभागाचे मोबाइल ॲप; गैरसोय टळणार



अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

खताची कृत्रिम टंचाई भासवून शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या खत विक्रेत्यांची दुकानदारी आता बंद होणार आहे. राज्य शासनाचा कृषी विभाग व बारामती येथील कृषी विज्ञान केंद्राने 'कृषिक' मोबाइल ॲप विकसित केले असून यावर कोणत्या खत विक्रेत्यांकडे खताचा किती साठा आहे, कोणते खत उपलब्ध आहे, याची माहिती मिळणार आहे. शिवाय, ठुकल्या पिकाला खत काय द्यावे, हेसुद्धा कळणार आहे. त्यामुळे ऐन पेरणीच्या वेळी शेतकऱ्यांची खतासाठी होणारी धावपळ आता थांबणार आहे.

जिल्ह्यात खरीप हंगाम जवळ आला असून कृषी विभागासह शेतकरीही खरिपाच्या नियोजनात व्यस्त आहेत. जवळपास २ लाख १९ हजार ३३२ हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी होईल, असा अंदाज आहे. पेरणीच्या वेळी धावपळ होऊ नये, यासाठी शेतकरी आतापासूनच खत, बियाणांची जुळवाजुळव करीत आहेत. दरवर्षी शेतकऱ्यांना आवश्यक असणारे बियाणे, खत ऐनवेळी उपलब्ध होत नाही. मात्र, आता या ॲपद्वारे कृषी केंद्रांकडील खत व बियाणांचा साठाची तसेच कुठल्या पिकाला कोणते खत किती प्रमाणात द्यावे, याबाबाबतही माहिती मिळणार आहे.

### कृत्रिम खतटंचाई, शेतकऱ्यांची लूट थांबणार

काही कृषी निविष्ठा विक्रेत्यांकडून खत, बियाणांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. साठा उपलब्ध असूनही खत संपले, उपलब्ध होईल की नाही, अशी उत्तरे दिली जातात. तेच जादा पैसे दिल्यास मात्र खत उपलब्ध करून दिले जात असल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. ही लूट थांबणार असून खत विक्रेता दुकानांच्या यादीसह त्या दुकानात कोणत्या खताचा किती साठा उपलब्ध आहे, हे पाहावयास मिळणार आहे. यामुळे खताचा काळाबाजार रोखला जाणार आहे.

### 'कृषिक' ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध


मोबाइलवरील प्ले स्टोअरमधून कृषिक ॲप डाऊनलोड करावे. त्यानंतर आवश्यक परमिशन देऊन ॲप सुरू करावे. यातील चावडी ऑप्शनवर क्लिक करावे. त्यानंतर 'खत उपलब्ध' पर्यायावर जिल्हा व तालुक्याची माहिती भरावी. त्यानंतर खताचा साठा पाहता येणार आहे.

### शेतकाम सोडून रांगेत उभे नाही रहावे लागणार

शेतकऱ्यांना खत, बियाणांसाठी कृषी केंद्रांमध्ये रांग लावून उभे रहावे लागते व यात त्याचा दिवस जातो. हा प्रकार आथा थांबणार आहे. ॲपवर कृषी केंद्रात कोणते खत, बियाणे किती प्रमाणात उपलब्ध आहे हे कळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना रांगेत ताटकळण्याची गरज राहणार नाही.

### 'कृषिक' ॲप सांगणार खताची मात्रा

'कृषिक' ॲपवर पिकासाठी खताची किती मात्रा द्यायची. त्याचा वापर कसा करायचा. याचीही माहिती मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांसाठी ॲप मार्गदर्शक ठरणार आहे.



### बाजारभाव व कृषीविषयक योजनांची माहिती

'कृषिक' ॲपवर पिकांना खताची किती मात्रा द्यायची याची माहिती मिळणार असतानाच खताचा बाजारभाव, कृषी विभागाच्या योजना, उत्पादने, प्रशिक्षण आदींचीही माहिती मिळणार आहे.

### ...तर होणार कारवाई

खत विक्री दुकानातील उपलब्ध खत साठ्याची आकडेवारी कृषी विभागाच्या वतीने 'कृषिक' ॲपमध्ये अपडेट केली जाणार आहे. दुकानात खत उपलब्ध असूनही खताची कृत्रिम टंचाई केली जात असल्याचे समोर आल्यास अशा खत विक्रेत्यांवर कृषी विभागाच्या वतीने कारवाई केली जाणार आहे.

### पशुखाद्य, क्रॉप कव्हर, मल्चिंगबाबतही माहिती

'कृषिक' ॲपमधून आदर्श पशुखाद्य, क्रॉप कव्हर, मल्चिंगबाबतही माहिती मिळणार आहे. एकंदर शेतकऱ्यांसाठी हे शेतीला घेऊन परिपूर्ण असे ॲप ठरणार आहे.

# चौथी, सातवीकरिता शिष्यवृत्ती परीक्षेसाठी हालचाली सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

पूर्वी इयत्ता चौथी व सातवीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जात होती; मात्र शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांकरिता ही परीक्षा घेण्यात येऊ लागली. आता पुन्हा त्यामध्ये बदल करून चौथी आणि सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची ही शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याच्या हालचाली शासन पातळीवर सुरू आहेत. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने तसा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला आहे. लवकरच शासन याबाबत निर्णय घेऊन विद्यार्थी, पालकांना माहिती दिली जाणार आहे. शालेयस्तरावर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा अनुभव मिळावा, यासाठी वर्षानुवर्षे पाचवी आणि आठवीच्या वर्गामध्ये घेतली जाणारी शिष्यवृत्ती परीक्षा पूर्वीप्रमाणे अनुक्रमे चौथी आणि सातवीच्या वर्गासाठी घेण्यात येणार आहे. शिष्यवृत्ती परीक्षांचे आयोजन करणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने' या संदर्भातील प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे पाठविला आहे. सरकारच्या मान्यतेनंतर हा बदल होणार आहे.राज्यभरातून दोन्ही परीक्षांचे मिळून तब्बल १५ लाख विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला बसतात. त्यातील पात्र विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती दिली जाते. सरकारकडून मान्यता मिळाल्यानंतर किमान वर्षभर अगोदर विद्यार्थ्यांना परीक्षा बदलाची माहिती मिळावी, यासाठी शासनाकडून शिष्यवृत्ती परीक्षेत बदल लवकरच करण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांना शिष्यवृत्ती परीक्षेत झालेल्या बदलाची लवकर माहिती मिळणार आहे.

**किती मिळते शिष्यवृत्ती**

उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा योजनेंतर्गत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक शाळा (पाचवी) सर्व संचाकरिता ५०० रुपये प्रतिमहिना, माध्यमिक शाळा (आठवी) सर्व संचाकरिता ७५० रुपये प्रतिमहिना इतकी शिष्यवृत्ती मिळते.

# आता शेतजमिनीची फक्त २०० रुपयांत होणार हिस्सेवाटप मोजणी

## रकमेत मोठी कपात : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नागपूर**

राज्यातील शेतकऱ्यांच्या जमीन मोजणीबाबत महसूल विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. शेतजमिनीच्या हिस्सेवाटप मोजणी शुल्कात मोठी कपात करण्यात आली असून, आता राज्यातील जमिनींची हिस्सेवाटप मोजणी अवघ्या २०० रुपयांमध्ये होणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. पूर्वी १ हजार ते ४ हजार रुपये प्रतिहिस्सा असे आकारण्यात येणारे शुल्क आता अवघे २०० रुपये करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जमीन मोजणी ही शेतकऱ्यांसाठी आणि जमीनमालकांसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. जमिनीच्या सीमांचे निर्धारण अचूकपणे करण्यासाठी मोजणी आवश्यक असते. बऱ्याचवेळा जमिनीच्या सीमांवरून वाद निर्माण होतात. त्यामुळे या मोजणीला प्राधान्य दिले जाते.






हा निर्णय राज्यातील अनेक शेतकऱ्यांना थेट लाभ व दिलासा देणारा आहे. महसूल विभाग अधिकाधिक लोकाभिमुख कसा होईल, याकडे मी जातीने लक्ष देत आहे. हिस्सेवाटप मोजणी प्रक्रियेतील शुल्कात मोठ्या प्रमाणात कपात करणारा हा निर्णय शेतकऱ्यांच्या फायद्याचा ठरेल, अशी मला खात्री आहे. या महत्त्वाच्या निर्णयाबाबत मला मार्गदर्शन करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी आभार मानतो.

**– चंद्रशेखर बावनकुळे,**
**महसूलमंत्री.**

यापूर्वी जमाबंदी आयुक्तांच्या आदेशानुसार मोजणीसाठी शुल्क आकारले जात होते. मात्र, मोजणीसाठी शेतकऱ्यांच्या तक्रारी व सूचनांनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रक्रियेत मोठा बदल घडवून आणला आहे. महसूल विभागातील जमाबंदी आयुक्त आणि भूसंपादन संचालकांच्या बैठकीत हा निर्णय अंतिम करण्यात आला. त्यानुसार आता मोजणीसाठी केवळ २०० रुपये शुल्क आकारले जाणार असून, ही सेवा सर्व सामान्यांसाठी खुली राहणार आहे. सातबारा अभिलेखांमध्ये वाटणी झाल्यानंतर त्यास अनुसरून पोट विषयांची मोजणी करणे ही प्रक्रिया पूर्वी गुंतागुंतीची होती. आता ती सुलभ, वेगवान आणि खर्चिकतेपासून मुक्त झाली आहे.

# मधाचे गाव आमझरी येथे मधपाळ मेळावा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**




महाराष्ट्र राज्य खादी व गामोद्योग मंडळातर्फे २० मे २०२५ जागतिक मधमाशा दिनानिमित्त अमरावती जिल्ह्यातील 'मधाचे गाव' आमझरी येथे मधपाळांचा मेळावा व विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. आमझरी येथील पर्यटन संकुलात आयोजित कार्यक्रमाला जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदिप चेचरे, सरपंच सारिका भास्कर, उपसरपंच वासु हेकडे, मंडळ कृषी अधिकारी किरण मुळे, स्फूर्ती क्लस्टरचे सुनिल भालेराव, मधमाशा तज्ज्ञ प्राध्यापक विद्यानंद अहिरे आदिवासी विभागाच्या श्रीमती नाईक, तंटामुक्ती अध्यक्ष रामू शेवलेकर, राजेश पटवर्धन, पोलीस पाटील श्रीमती दहिकर, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मंगेश बेलनकर, मंगेश वानखेडे, नंदकुमार सहारे, प्रकाश आसोलकार तसेच वनविभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला महात्मा गांधीजीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री.चेचरे यांनी मधपाळांना मानवी जीवनातील मधमाशाचे महत्त्व विषद करुन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मधाचे गाव आमझरी येथे पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शासनाने आमझरी मधाचे गाव म्हणून घोषित केले असून या ठिकाणी लवकरच लाभार्थ्यांना मधमाशा पालनाचे प्रशिक्षण व संबंधित उपक्रम सुरु होणार आहेत. त्यामध्ये स्थानिक मधपाळ व ग्रामस्थांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. मंडळ कृषी अधिकारी किरण मुळे यांनी कृषी विभागाच्या योजनांची यावेळी माहिती दिली. स्फूर्ती क्लस्टरचे सुनिल भालेराव यांनी मार्गदर्शन केले. राजेश पटवर्धन यांनी बचतगटाच्या कामकाजाबाबत माहिती दिली. उपसरपंच वासुदेव हेगडे यांनी मधाचे गाव योजना यशस्वीरित्या राबविण्याचे ग्रामस्थाच्या वतीने आश्वासन दिले. तसेच विद्यानंद अहिरे यांनी मधमाशा पालनाबाबत माहिती दिली.

**मधुसखीची निवड**

या कार्यक्रमात प्रमिला कंदिलवार व सुमन कास्देकर यांची मंडळामार्फत 'मधुसखी' म्हणून नेमणूक करण्यात आली. मधुसखींवर चिखलदरा तालुक्यात मधमाशांचे संवर्धन व संरक्षणाबाबत जनजागृती करणे तसेच निर्सगातील मधमाशांचे नुकसान टाळण्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी राहणार आहे. कार्यक्रमाचे संचालन मंडळाचे उद्योग पर्यवेक्षक मंगेश वानखेडे यांनी तर आभार निरीक्षक प्रकाश आसोलकार यांनी मानले. या कार्यक्रमाला आमझरी, टेटु, खडकली, भेलोरी या गावातील मधपाळ व महिला बहुसंख्येने हजर होत्या.




# ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील हे शुक्रवार, दि. २३ मे रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. दौऱ्यानुसार, शुक्रवार, दि. २३ मे रोजी सकाळी ११ वाजता डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे 'पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या: कारणे आणि उपाय' या संशोधन प्रकल्पाच्या सभेस तज्ज्ञ अभ्यासक म्हणून उपस्थित राहतील.

